3

# भारत सरकार शिष्यवृत्ती /फ्रिशिपचे अर्ज छाननी नियमावली

**सन २०१७.२०१८ या शैक्षणिक वर्षातील भारत सरकार शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरणा करणे करिता शिष्यवृत्ती/फ्रिशिपधारक विद्यार्थ्यानि राष्ट्रीयकृत बॅकेत खाते उघडणे आवश्यक व बॅक खात्याशी आधारलिंक व आधार कार्डशी मोबाईल नंबर लिंक असणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया पुर्ण असल्याशिवाय ऑनलाईन भारत सरकार शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरता येणार नाही.**

१ अभ्यासक्रम सुरू झालेले शैक्षणिक वर्ष हे सन २०१७.२०१८ असणे आवश्यक आहे.

२ सन २०१६.२०१७ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेली परीक्षेची साक्षांकित गुणपत्रिका.

३ S.S.C. गुणपत्रिका साक्षांकित प्रत

४ डोमेशिअल दाखला साक्षांकित प्रत

५ जातीचा दाखला साक्षांकित प्रत

६ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यानि राष्ट्रीयकृत बॅकेत खाते उघडणे आवश्यक आहे. शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा फॉर्म भरताना बॅक खाते क्रमांक, मायकर कोड, आयएफएससी कोड, आवश्यक आहे.

७ अर्जासोबत संबंधित विद्यार्थ्याचे हमी पत्र असणे आवश्यक.

८ **जे विद्यार्थी मागील वर्षी नापास असतील अशा विद्यार्थ्यांचा अर्ज नामंजूर केला जाईल त्याचप्रमाणे जे विद्यार्थी मागील वर्षी बी.एड. अथवा विद्याशाखा बदलून आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करता येत नाहीत. अशा विद्यार्थ्यांकडून त्या अभ्यासक्रमाचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क भरून घेणे आवश्यक आहे.**

९ शैक्षणिक खंड असेल तर त्याप्रमाणे संबंधित विद्यार्थ्यानि गॅप सर्टीफिकेट आवश्यक आहे.

१० ज्या विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अर्ज भरणा केलेले आहे अशा विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११ वडिलांचा उत्पन्नाचा दाखला तहसिलदार यांच्या सहीचा (दि.१ एप्रिल, २०१६ ते दि.३१ मार्च, २०१७ या कालावधीतील), वडील जर शासकीय सेवेत असतील तर त्यांच्या उत्पन्नाबाबत १६ नंबरचा फॉर्म वडिल मयत असल्यास त्यांच्या मृत्युचा दाखला, त्याचप्रमाणे आईही मयत असल्यास विद्यार्थी ज्यांच्याकडे राहत आहे त्या पालकाचा उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

१२ विद्यार्थी वसतिगृहात राहत असल्यास सोबत वसतिगृह प्रवेशाची पावतीची साक्षांकित प्रत अर्जासोबत आवश्यक आहे.

१३. उत्पन मर्यादा

- एस.सी.संवर्गातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन हे रू.२,००,०००/— पर्यंत उत्पन्न मर्यादा आहे. फ्रिशिप करीता उत्पन्न मर्यादा नाही. (एम.टेक., पीएच.डी.या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या एस.सी. संवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन रू.६,००,०००/— पेक्षा आधिक होत असल्यास सदर विद्यार्थी अपात्र होईल.)
- एन.टी., ओबीसी, एसबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन हे रू.१,००,०००/—पर्यंत आहे ते विद्यार्थी शिष्यवृत्ती करीता ग्राहय धरले जातील. त्यापुढील रू.६,००,०००/—पर्यंत उत्पन असणारे विद्यार्थी

...शिपसाठी ग्राहय धरले जातील. त्या पुढील विद्यार्थी शिष्यवृत्ती/फ्रिशिपकरीता अपात्र ठरतात. अशा विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क भरून घेणे आवश्यक आहे.

१४ एम.फिल. अभ्यासक्रमाचा एक वर्षाचा तर पीएच.डी. अभ्यासक्रम हा तीन वर्षाचा अभ्यासक्रम आहे.

१५ ज्या विद्यार्थ्यांच्या नावात बदल झाला असेल अशा विद्यार्थ्यांनी अर्जासोबत गॅझेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

१६ जे विद्यार्थी शासकीय /निमशासकीय/खाजगी क्षेत्रामध्ये नोकरी करीत असल्यास तसेच प्रशिक्षणार्थी असल्यास,त्यास पगार/मानधन/स्टायपेंड मिळत असल्यास संबधित विद्यार्थी हा भारत सरकारच्या मागासवर्गीय शिष्यवृत्तीच्या नियमानुसार अपात्र ठरतो. तेंव्हा अशा विद्यार्थ्यानी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरू नये अशा विद्यार्थ्यांनि पूर्ण शैक्षणिक शुल्क भरावे.

१७.भारत सरकार मागासवर्गिय शिष्यवृत्ती/फ्रिशिपकरीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या अनुदानित/विनाअनुदानित अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक शुल्क मंजूरीबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयामध्ये शासनाकडून वेळोवेळी बदल होत असतात. त्यामुळे संबधित मागासवर्गिय विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क हे शासनाकडून मंजूर होईलच असे नाही. अशा वेळी संबधित अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क संबधित विद्यार्थ्यास भरावे लागेल ही बाब संबधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी.

१८. संबधित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनि त्याच्या अभ्यासक्रमातूनच अर्ज भरणे आवश्यक आहे अन्य अभ्यासक्रमातून अर्ज भरणा करू नये अन्यथा असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

१९. ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश हा नॉन कॅप मधून झालेला आहे अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा लाभ देता येणार नाही.

२०. भारत सरकार शिष्यवृत्ती/फ्रिशिपच्या नियमानुसार एखादया विद्यार्थ्यांनि शासनाकडून दिल्या जाणा—या विविध शिष्यवृत्ती व फिमध्ये मिळणा—या सवलती पैकी एकच कोणतीही शिष्यवृत्ती अथवा फी सवलतीचा लाभ घेणे आवश्यक आहे. एकापेक्षा अनेक शिष्यवृत्ती अथवा फी सवलतीसाठी संबंधित विद्यार्थ्यांनि अर्ज केला असल्यास सदर शिष्यवृत्ती/फ्रिशिपसाठी संबंधित विद्यार्थी अपात्र ठरतो.

२१. विद्यापीठ अधिविभागातील ज्या स्वावलंबी तत्वावर शिकवल्या जाणा—या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या व एनटी, ओबीसी, एसबीसी या संवर्गातील विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी शासनाचे http://mahadbt.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ पहावे व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.